माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ८५३/२०२५**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. विरेंद्र नागेश पुणेकर, घर क्र. १२०, पुणेकर निवास, बाबापूर पोस्ट, चार्ली, ता. राजुरा, जि. चंद्रपूर-४४२९०५ | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर |

**सुनावणी दिनांक :- ०८.०९.२०२६**

**१. उपस्थिती —**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज —**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०१.०४.२०२५
(२) व्दितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३.०४.२०२५
(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे.
(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विंनंती केलेली आहे.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १८.०१.२०२५
(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २१.०१.२०२५
(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : नमूद केलेला नाही.
(४) **जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत खालील तपशिलानुसार माहिती करिता अर्ज सादर करत आहे. सदर अर्ज तलाठी विनोद गेडाम यांच्या संदर्भातील लाचप्रकरणी आणि त्यांच्या पुनर्नियोजनाबाबत आहे.

**१. तलाठी श्री. विनोद गेडाम यांच्यावरील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईसंबंधी तपशील.**

१.श्री. तलाठी विनोद गेडाम यांना लाच मागण्याबाबत झालेल्या तक्रारीचे तपशील. २. संबंधित तपासाची माहिती आणि कारवाईची प्रक्रिया. ३. तलाठी विनोद गेडाम यांच्या घरावरील छाप्यानंतर कार्यवाहीचा तपशील. ४. ८ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या रेती पुरवठा ट्रक संदर्भातील कारवाईशी संबंधित सर्व कागदपत्रे. ५. २५ हजार रुपयांच्या लाच मागणीची तपासणी आणि कायदेशीर प्रक्रिया.

**२. तलाठी श्री. विनोद गेडाम यांच्या पुनर्नियोजनाविषयी माहिती.**

१.तलाठी विनोद गेडाम यांना दोषी ठरल्यावर पुन्हा नवा पदभार देण्यात आला याचा संपूर्ण तपशील. २. तहसिल कार्यालयाच्या अतिक्रमण विभागात आणि तलाठी साझा तेंबुरवाही देण्यात आल्याचा संपूर्ण तपशील. ३. संबंधित विभागाच्या वतीने घेतलेल्या या निर्णयाच्या संपूर्ण प्रक्रियेची माहिती.

**३. तलाठी श्री. विनोद गेडाम यांच्या पुनर्नियोजनाविषयी माहिती.**

१. चंद्रपूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या तपासणी रिपोर्टची पूर्ण माहिती. २. आरोपी तलाठी विरुध्द कागदपत्रे किंवा संबंधित नोंदी. ३. ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणात कार्यवाही केली आहे. त्यांच्या नावे आणि अधिकाराचा तपशील देण्यात यावा.

५. **जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही** : अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, आपला अर्ज या कार्यालयात दिनांक २१.०१.२०२५ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जात मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षासंबंधि (श्री. व्हि.एम.गेडाम, तलाठी) असल्यामूळे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ११ अन्वये सदर अर्जात मागीतलेली माहिती पुरविण्याबाबत त्रयस्थ पक्ष यांना दिनांक ११.०२.२०२५ रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने श्री. व्हि.एम.गेडाम, तलाठी यांचा अर्ज या कार्यालयात प्राप्त झालेला असून सदर माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असल्यामूळे, माहिती देण्यास त्यांची परवानगी नाही, असे अपिलार्थीस कळविले.

६. **प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २७.०२.२०२५

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २८.०२.२०२५

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : मागितलेली माहिती मिळाली नाही.

(४) **अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही** : अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांचा अपील अर्ज अमान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, राजुरा तसेच सहा. जन माहिती अधिकारी तथा तलाठी आस्थापना, तहसिल कार्यालय, राजुरा यांनी माहिती अधिकार अर्जातील माहितीच्या अनुषंगाने माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्यामुळे देता येत नाही असे अपिलार्थी यांना कळविले आहे, असे आदेश पारित केले.

७. **युक्तीवाद/लेखी खुलासा** :-

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर श्री. चंद्रशेखर तेलंग उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या तर्फे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर श्री. चंद्रशेखर तेलंग उपस्थित आहेत.

२. आज सुनावणी दरम्यान प्राधिकरणाच्या वतीने नमूद केले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, आपला अर्ज या कार्यालयात दिनांक २१.०१.२०२५ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जात मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षासंबंधि (श्री. व्हि.एम.गेडाम, तलाठी) असल्यामूळे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ११ अन्वये सदर अर्जात मागीतलेली माहिती पुरविण्याबाबत त्रयस्थ पक्ष यांना दिनांक ११.०२.२०२५ रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने श्री. व्हि.एम.गेडाम, तलाठी यांचा अर्ज या कार्यालयात प्राप्त झालेला असून सदर माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असल्यामूळे, माहिती देण्यास त्यांची परवानगी नाही, असे अपिलार्थीस कळविले. तसेच अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांचा अपील अर्ज अमान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, राजुरा तसेच सहा. जन माहिती अधिकारी तथा तलाठी आस्थापना, तहसिल कार्यालय, राजुरा यांनी माहिती अधिकार अर्जातील माहितीच्या अनुषंगाने माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्यामूळे देता येत नाही असे अपिलार्थी यांना कळविले आहे, असे आदेश पारित केले.

३. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती दिलेली नाही. त्यामुळे संपूर्ण माहिती देण्याबाबत संबंधीतांना आदेशीत करावे.

८. **निष्कर्ष** — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

सदर प्रकरणी अपिलार्थी श्री. विरेंद्र नागेश पुणेकर यांनी दिनांक १८.०१.२०२५ रोजी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर यांच्याकडे माहितीसाठी अर्ज केला होता. त्यांच्या या अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.०२.२०२५ रोजी पत्र पाठवून अपिलार्थीस प्रतिसाद दिला. परंतु या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी दिनांक २७.०२.२०२५ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यांच्या या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८.०३.२०२५ रोजी सुनावणी घेतली आणि आदेशही पारित केले.

परंतु या आदेशाने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी दिनांक ०१.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाकडे द्वितीय अपील अर्ज दाखल केला. त्यांच्या या द्वितीय अपील अर्जावर आज दिनांक ०८.०९.२०२६ रोजी सुनावणी आयोजित केली असता, अपिलार्थी हे स्वत:, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर आयोगाकडून विद्यमान जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थी यांनी अर्जात मागितलेली माहिती रेकॉर्डवर उपलब्ध असेल तर विनामूल्य पुरविण्यात यावी. जर माहिती उपलब्ध नसेल तर, तसे लेखी स्वरुपात अपिलार्थीस स्पष्टपणे वस्तुस्थिती कळवून मूळ अर्ज संबंधित विभागाकडे वर्ग करावा व वर्ग करण्यात आल्याची प्रत अपिलार्थी यांना पुरविण्यात यावी. या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(गजानन निमदेव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०८.०९.२०२६**

जावक क्रमांक 8302 दिनांक 07 OCT 2026

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर